मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 06 मे 2026 | पान- 1

# महापालिकेच्या वतीने मधुकर दामोदर जोशी यांचा मानपत्र देऊन सन्मान

## विविध क्षेत्रातील योगदानाची दखल, 48 वर्षांनंतर महापालिकेत पुनरागमन; भावनिक क्षण

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेने मानपत्र देऊन माझा सन्मान केला याचा आनंद आहे, परंतु त्याहून अधिक समाधान या महानगरपालिकेच्या सर्वांगीण प्रगतीकडे पाहून मिळत आहे. आजच्या घडीला अनेक महानगरपालिकांमध्ये कार्यातील समर्पकपणा आणि एकसंधता दिसून येत नाही मात्र येथे ती स्पष्टपणे जाणवते. सुखद आणि सुरक्षित निवास, सुलभ व परिणामकारक प्रवास व्यवस्था, आणि आपुलकीचा सहवास या अपेक्षा एक नागरिक म्हणून सर्वांच्या आहेत. या सर्व बाबींमध्ये येथे होत असलेली प्रगती निश्चितच आशादायक आहे, असे मधुकर दामोदर जोशी म्हणाले.



पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तुत्वाने भर घालणाऱ्या तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीमत्त्वांचा महापालिका सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याचे धोरण ठरविण्यात आले होते. या धोरणानुसार आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत पत्रकारिता, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रात ठसा उमटवून शहराच्या नावलौकिकात भर घालणारे मधुकर जोशी यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसदस्य मधुरा शिंदे, शितल उर्फ विजय शिंदे, सविता आसवानी, मंदार देशपांडे, सुरेश भोईर तसेच उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

मधुकर जोशी म्हणाले, तब्बल ४८ वर्षांनंतर महानगरपालिकेच्या या वातावरणात पुन्हा येण्याचा योग आला, ही माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि अभिमानाची बाब आहे. या ठिकाणचे वैभव आणि प्रसन्नता केवळ भौतिक रचनेपुरती मर्यादित नसून, ती येथे कार्यरत असलेल्या प्रत्येकाच्या मनातील दृढ विश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोनातून प्रकर्षाने जाणवते. आजचे हे बदल आणि प्रगती पाहताना विशेष आनंद होत आहे.

तसेच महापालिका सभेत बोलताना नगरसदस्यांनी सखोल अभ्यास करूनच मते मांडणे अत्यंत आवश्यक आहे. अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणीमुळे शहरातील विविध प्रश्न अधिक समजून घेता येतात आणि त्यांचे निराकरण अधिक सुलभ व परिणामकारक पद्धतीने होण्यास मदत होते, असे मार्गदर्शनही त्यांनी यावेळी केले.

दरम्यान, पत्रकारिता, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेले मधूकर जोशी हे नगरपालिका असताना नगरसदस्य देखील म्हणून देखील कार्यरत होते.मानपत्राचे वाचन किरण गायकवाड यांनी केले.

# विजयाचा आनंद मोठा, पण चिमुकलीचे दु:ख त्याहून मोठे; पिंपरी-चिंचवड भाजपने नाकारला जल्लोष

## भारत माता व जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हा विजय साजरा करण्यात आला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या ऐतिहासिक यशाबद्दल संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण असतानाच, पिंपरी-चिंचवड शहर भाजपने मात्र आपली सामाजिक संवेदनशीलता जपली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या मोठ्या विजयाचा कोणताही सार्वजनिक जल्लोष, फटाकेबाजी किंवा गुलाल उधळण न करता, मोरवाडी येथील मुख्य कार्यालयात अत्यंत साधेपणाने भारत माता व जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष




डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हा विजय साजरा करण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे एका चिमुकलीवर झालेल्या दुर्दैवी अत्याचाराच्या घटनेमुळे शहर भाजपने हा संवेदनशील निर्णय घेतला. या घटनेचा निषेध व्यक्त करत आणि पीडितेबद्दल सहानुभूती दर्शवत पक्षाने सर्व नियोजित उत्सवी कार्यक्रम रद्द केले. मोरवाडी येथील मध्यवर्ती कार्यालयात पश्चिम बंगालमधील विजयाचे स्वागत केवळ भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी मातेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.

शत्रुघ्न बापू काटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास माजी खासदार अमर साबळे, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सदाशिव खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशाली खाडये यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना नेत्यांनी सांगितले की, बंगालमधील विजय हा लोकशाहीचा आणि विकासाच्या राजकारणाचा विजय आहे, याप्रसंगी राजेश पिल्ले, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, राजू दुर्गे, सुरेश भोईर, मंदार देशपांडे, पल्लवी वाल्हेकर, संजय पटणी, विजय सिनकर, नेताजी शिंदे, नंदू कदम, देवदत्त लांडे, प्रकाश जवळकर, संजीविनी पांडे, पोपट हजारे, युवराज लांडे, निलेश अष्टेकर, शितल कुंभार, संतोष भालेराव, गोरख कुंभार, गणेश ढाकणे, अजित भालेराव यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाहीतील विजयाचा आदर करतानाच सामाजिक दुःखात सहभागी होऊन भाजपने शहरवासीयांसमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे.

# बांधकाम प्रदूषणावर महापालिकेची कडक कारवाई; 150 हून अधिक बिल्डरांना नोटिसा

## बांधकाम प्रदूषणावर महापालिकेची कडक कारवाई; 150 हून अधिक बिल्डरांना नोटिसा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या बांधकाम गृह व व्यापारी प्रकल्पांमुळे होणारे धूळ व वायूप्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून कडक नियमावली लागू केली आहे. त्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. दीडशेहून अधिक बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्या असून, बांधकाम परवानगी स्थगित करण्याचा इशारा देण्यात आला आहे



वेगाने वाढणारे शहरीकरण, वाढती वाहनसंख्या आणि मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली बांधकामे यामुळे शहरात वायू प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, औद्योगिक परिसर तसेच, बांधकाम सुरू असलेल्या भागांमध्ये धुळीचे प्रमाण वाढले असून, वाहनांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावत असल्याचे चित्र दिसत आहे.

शहरातील वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत, किवळे, भोसरी, चिखली, मोशी, निगडी, पिंपरी, तळवडे, पिंपळे गुरव, कासारवाडी, सांगवी, दापोडी, आकुर्डी, पिंपळे निलख, रहाटणी, काळेवाडी, चऱ्होली, वडमुखवाडी परिसरात औद्योगिक आणि वाहतूक हालचाली मोठ्या प्रमाणावर होत असल्याने प्रदूषणाचे प्रमाण अधिक आहे. तसेच, महामेट्रो, उड्डाण पूल आणि रस्ते विस्ताराची कामे सुरू असल्याने धुळीचे प्रमाण वाढत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम साहित्य उघड्यावर ठेवले जात असल्याने वाऱ्यासोबत धूळ उडून वातावरण दूषित होत असल्याचेही निदर्शनास येत आहे.

हवेत सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढल्यास दमा, श्वसनाचे आजार, एलर्जी तसेच, डोळ्यांच्या तक्रारी वाढत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचे आजार असलेल्या व्यक्तींना याचा अधिक त्रास होत आहे. घरातील साहित्यांवर धुळीचे स्थर जमा होतात. रात्री दहानंतर बांधकाम सुरू ठेवल्याने कर्कश आवाजाने रहिवाशी हैराण झाले अहेत. मोठ्या बांधकाम प्रकल्पांमुळे परिसरात धूळ उडणे, रस्त्यांवर माती साचणे आणि हवेची गुणवत्ता खालावणे, या सारख्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

### रात्री दहा ते सकाळी सात बांधकामांना बंदी

» पिंपरी-चिंचवड शहरातील गृहनिर्माण बांधकामामुळे वायु व ध्वनी प्रदूषणात वाढ होत आहे. त्यानुसार महापालिकेकडून संबंधित बांधकामांवर नियंत्रण ठेवत नियमावली तयार करण्यात आली आहे. रात्री दहा ते सकाळी सातपर्यंत बांधकामे बंद ठेवण्यात येत आहेत. याशिवाय अन्य नियमानुसार बांधकाम व्यावसायिकांनी काम करावे, असे निर्देश दिलेले आहेत. तसेच प्रत्येकाने उपाययोजनांवर लक्ष देण्यास सांगण्यात आले आहे. मात्र, नियमांचे उल्लंघन करणार्यांना नोटीसा बजावण्यात येत आहेत, असे महापालिकेचे सहशहर अभियंता सुनील भागवानी यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेकडून बांधकामांवर पाणी फवारणी करणे, धूळ रोखण्यासाठी जाळ्या (ग्रीन नेट) बसविणे, रस्ते नियमित स्वच्छ करणे आणि नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात बांधकाम व्यावसायिकाकडून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होताना नाही. अनेक भागात सर्रासपणे नियमाचे उल्लंघन केले जात असून, उपाययोजनाकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिक तीव्र संताप व्यक्त करत आहेत.

तक्रारींची दखल घेऊन महापालिका प्रशासनाने प्रत्यक्ष बांधकाम स्थळाची पाहणी केली. त्यानुसार दीडशेहून अधिक बांधकाम व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. नियमानुसार तातडीने उपाययोजना न केल्यास बांधकाम परवानगीस स्थगिती देण्यात येण्याचा इशारा बांधकाम परवानगी विभागाने दिला आहे.

# दापोडी-कासारवाडी-फुगेवाडीत पाणीटंचाई; कमी दाबाने पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

## उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण; टँकर व वॉटर एटीएमवर नागरिकांची मदार

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवसाआड कमी दाबाने होत असलेला पाणीपुरवठा आणि यात वीज कपात यामुळे दापोडी, कासारवाडी, फुगेवाडीकर यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. सर्वसामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.



मार्च, एप्रिल, मे महिन्यातील कडाक्याचा उन्हाळा आणि यात अंगाची लाही लाही होत असताना दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी या परिसरात वीज कपात आणि पाणीपुरवठ्याचा बोजवारा उडाल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पाणी अनियमित वेळी आले तर ते कमी दाबाने येते, पाणी मिळाले तर नशीब; नाही तर पाण्यासाठी शोध मोहीम करावी लागते. जारसाठी नागरिकांना जास्त पैसे द्यावे लागत आहेत.

दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी परिसरात या गोंधळाचा सर्वाधिक फटका बसत आहे. घरामध्ये पिण्यासाठी पाणी उपलब्ध नसेल तर नागरिकांना एकतर टँकर मागवावा लागतो; अन्यथा वॉटर एटीएममध्ये जाऊन पिण्याचे पाणी आणावे लागत आहे.

महापालिकेच्यावतीने स्थानिक रहिवाशांना पाणीपुरवठा सुरळीत मिळावा यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करुन जलकुंभाची निर्मिती करण्यात आली. मात्र, आजही या परिसरातील स्थानिक रहिवाशांना पाण्यासाठी भटकंती वणवण करावी लागत आहे. मिळेल त्या ठिकाणी वॉलचे आणि जारचे पाणी किंवा ज्यादा पैसे देऊन पाण्याचा टँकर घेऊन तहान भागवावी लागत आहे.

फुगेवाडी परिसरात पाण्याची टंचाई आहे. नेहमीच्या वेळेत पाणी आले असले तरी त्याचा दाब कमी असतो. नेहमीच्या वेळेपेक्षा कमी वेळ पाणीपुरवठा झाल्याने गृहिणी, नोकरदारांची मोठी गैरसोय होत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याची मागणी वाढलेली असताना अशा प्रकारे अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे. त्यामुळे अनेक नागरिकांना स्व:खर्चाने पाणी आणावे लागते. यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी जार विकत घेणे किंवा सार्वजनिक वॉटर एटीएमचा आधार घेण्याची वेळ येते. अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नोकरदार आणि गृहिणींचे नियोजन कोलमडले आहे. ऐन उन्हाळ्यात वारंवार होणाऱ्या दुरुस्तीच्या कामामुळे प्रशासनाविरोधात नाराजी वाढत आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरुन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### नागरिकांमध्ये नाराजी

» परिसरातील अनेक टाक्या वेळेत भरल्या जात नाहीत. त्यामुळे अनेक नागरिकांना स्व:खर्चाने पाणी आणावे लागते. यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी जार विकत घेणे किंवा सार्वजनिक वॉटर एटीएमचा आधार घेण्याची वेळ येते. अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नोकरदार आणि गृहिणींचे नियोजन कोलमडले आहे. ऐन उन्हाळ्यात वारंवार होणाऱ्या दुरुस्तीच्या कामामुळे प्रशासनाविरोधात नाराजी वाढत आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरुन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# पुण्यात पाणीकपात नाही, महापौरांनी दिले आदेश...

## महापौर मंजुषा नागपुरे यांनी 31 मे पर्यंत कोणतीही पाणीकपात न करण्याचे आदेश दिले.



**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या मिळकतकर वसुलीस स्थगिती दिली आहे. त्यानंतर महापालिकेने शासनाने जे कर आकारणीचे आदेश दिले होते. त्यानुसार कर आकारणी केलेली नाही. अशा स्थितीत कर भरायचा की नाही, अशा मनस्थितीत या गावांमधील नागरिक असून, शासन आणि महापालिकेने तत्काळ यावर तोडगा काढावा, अशी मागणी महापालिकेच्या विरोधी पक्षांच्या गटनेत्यांनी सोमवारी आमदार माधुरी मिसाळ यांच्याकडे केली.

महापालिकेच्या प्रलंबित प्रश्नांबाबत ही बैठक बोलविण्यात आली होती. यात ही मागणी केल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे गटनेते सोपानराव ऊर्फ काका चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. चव्हाण म्हणाले, की दोन वर्षांपासून समाविष्ट गावांच्या मिळकतकराचा प्रश्न प्रलंबित आहे. त्याबाबत कोणताही निर्णय होत नसल्याने काही जण कर भरतात, तर कोणी भरत नाही.

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या मिळकतकर वसुलीस राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी स्थगिती दिली होती. त्यानंतर कर आकारणीबाबत स्पष्ट निर्णय न झाल्याने नागरिक संभ्रमात आहेत. काही जण कर भरत आहेत, तर काहींनी थांबवला आहे. त्यामुळे गावांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अशा स्थितीत थकबाकीवर २ टक्के शास्तीही आकारली जाते. दुसरीकडे या गावांच्या विकासासाठी निधीही आवश्यक असून, नागरिक कर भरण्यास तयार आहेत. त्यामुळे तत्काळ या विषयावर तोडगा काढावा अशी मागणी केली असून, महापालिका आयुक्तांनीही पुढील १५ दिवसांत त्यासाठी बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे.महापालिकेकडून समाविष्ट गावांसाठी समान पाणी योजनेच्या धर्तीवर उर्वरीत १६ गावांसाठी एकच योजना राबविली जाणार आहे. त्यासाठी पुरेसा निधी नसल्याने महापालिकेने जागतिक बँकेला प्रस्ताव दिला आहे. मात्र, तो निधी मिळाला, तरी प्रत्यक्षात योजनेची अंमलबजावणी आणि काम सुरू होण्यास आणखी काही वर्षे जाणार आहेत.

### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**» पुणे शहरात पाणीपुरवठा सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात येत आहे. एआय-आधारित लीक डिटेक्शन, रोबोटिक कॅमेरा तपासणी, वाहन ट्रॅकिंग प्रणाली आणि मोबाईल ॲपद्वारे नियंत्रण यांसारख्या उपाययोजना राबवण्यात येत आहेत. तसेच नव्याने समाविष्ट भागांत पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू आहे. तांत्रिक कर्मचारी आणि अभियंत्यांच्या रिक्त पदांची भरतीही करण्यात येणार आहे. यामुळे भविष्यातील पाणीपुरवठा अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक होणार आहे.**

### पाणीकपात टळली

**» पुणे शहरात मान्सूनपूर्व आढावा बैठकीनंतर महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ३१ मेपर्यंत कोणतीही पाणीकपात न करण्याचे आदेश देण्यात आले. शहराला पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला धरणांतून पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे नागरिकांना अखंड पाणीपुरवठा देण्यावर भर देण्यात आला आहे. जलशुद्धीकरण केंद्रांची देखभाल पूर्ण करण्यात आली असून, पाण्याची गुणवत्ता टिकवण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या आहेत.**

### मान्सूनपूर्व तयारी

**» पुणे महानगरपालिकेने मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा व्यवस्थेची सखोल तयारी सुरू केली आहे. शहरातील १७ जलशुद्धीकरण प्रकल्पांची दुरुस्ती, फिल्टर बेड स्वच्छता आणि क्लोरीनेशन प्रक्रिया मजबूत करण्यात आली आहे. पावसाळ्यातील गढूळ पाण्याचा सामना करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. प्रयोगशाळांमध्ये पाण्याचे नमुने तपासले जात असून, आवश्यक रसायनांचा साठा ठेवण्यात आला आहे. नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे.**

---

# हिंजवडी आयटी पार्कमधील कोंडीतून सुटका! आयटीयन्ससाठी 70 मार्गावर शटल बससेवा

## हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सुरु करण्यात आलेली 'कोको राईड्स' शटल बससेवा.




**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी आता शटल बससेवा सुरू करण्यात आली आहे. हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशनने यासाठी पुढाकार घेतला असून, उपयोजन (ॲप) आधारित ही कोको राईड्स सेवा मंगळवारपासून सुरू झाली. आयटी पार्कमधील ८० हून अधिक कंपन्यांतील सुमारे सव्वा लाख कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशनने (एचआयए) कोको राईड्स सेवेसाठी रूटमॅटिक कंपनीसोबत भागीदारी केली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाने या सेवेसाठी सहकार्य केले आहे. आयटी पार्कमधील इन्फोसिस कंपनीच्या कार्यालयापासून या सेवेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी एचआयएचे अध्यक्ष सुब्रह्मण्यम राधाकृष्णन, रूटमॅटिकचे संस्थापक व मुख्याधिकारी श्रीराम कन्नन आणि कार्यकारी संचालक कविता रामचंद्रगौडा आदी उपस्थित होते. ही उपयोजन आधारित सेवा असून, एचआयएच्या सदस्य कंपन्यांना या बससेवेतील आसने आरक्षित करण्यासह नवीन मार्गांचे नियोजन करता येणार आहे.

यावेळी एचआयएचे अध्यक्ष सुब्रह्मण्यम राधाकृष्णन म्हणाले की, हिंडवडी आयटी पार्कमध्ये सामाईक वाहतूक सेवा सुरू करण्यासाठी उद्योगांनी एकत्र येऊन पाऊल उचलले आहे. यातून व्यवहार्य असा कोको राईड्सचा पर्याय वाहतुकीसाठी उपलब्ध झाला आहे. यामुळे आयटी कर्मचाऱ्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार असून, त्यांचा प्रवास सुकर होणार आहे. याचबरोबर शहराच्या पायाभूत सुविधांवर येणारा ताणही कमी होण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी रुटमॅटिकचे संस्थापक व मुख्याधिकारी श्रीराम कन्नन म्हणाले की, देशातील आघाडीच्या तंत्रज्ञान केंद्रामध्ये सध्या पायाभूत सुविधांची गंभीर समस्या आहे. वाढत्या कर्मचारी संख्येचा ताण या पायाभूत सुविधा सहन करू शकत नाहीत. त्यामुळे भविष्यात कंपन्यांना एकत्र येऊन कोको राईड्ससारखी सामाईक, विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था सुरू करावी लागेल. आता पुण्यात आम्ही ही सेवा सुरू करीत आहोत.

### मध्यवर्ती नियंत्रण कक्ष

**» कोको राईड्स सेवेवर देखरेख ठेवण्यासाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून प्रत्येक बसच्या हालचालीवर या कक्षातून नजर ठेवली जाणार आहे. याचबरोबर आयटी कर्मचारी कोको राईड्स उपयोजनाच्या (ॲप) आधारे या सेवेचा त्यांच्यानजीकचा थांबा आणि मार्ग निवडू शकतात. तसेच, या बसमधील आसनही आरक्षित करू शकतात.**

# ‘पीएमआरडीए’चा 4,628 कोटींचा अर्थसंकल्प!

## पीएमआरडीएच्या सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठीच्या 4 हजार 628 कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीच्या ४ हजार ६२८ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला सोमवारी मंजुरी देण्यात आली. रिंगरोड, मेट्रो आणि पायाभूत सुविधांना या अर्थसंकल्पात प्राधान्य देण्यात आले असून अभियांत्रिकी विभागासाठी सर्वाधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. जमीन विल्हेवाटीच्या दैनंदिन कामकाजाचे अधिकार थेट महानगर आयुक्तांना देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

पीएमआरडीएचे अध्यक्ष, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मुंबई बैठक झाली. त्यामध्ये अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे, दोन्ही महापालिकांचे स्थायी समिती अध्यक्ष, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव श्रीकर परदेशी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, ‘पीएमआरडीए’चे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी, वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोळंबे, संचालक अविनाश पाटील, मुख्य अभियंता रिनाज पठाण आदी उपस्थित होते.

महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी हा अर्थसंकल्प प्राधिकरण सभेपुढे ठेवला. या अर्थसंकल्पानुसार, ‘पीएमआरडीए’चे सन २०२५-२६ चे सुधारित आणि सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक मांडण्यात आले. २०२६-२७ साठी प्राधिकरणाची एकूण महसुली आणि भांडवली जमा ४ हजार ६२८.८५ कोटी अपेक्षित आहे. एकूण खर्च ४ हजार ६२५.३० कोटी असून, अर्थसंकल्प ३.५५ कोटी रुपये शिलकीचा आहे. अग्निशामक निधीसाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली असून, २०२६-२७ मध्ये या निधीत १००.०५ कोटी रुपये जमा होण्याचा अंदाज आहे. त्यांपैकी ७१.०४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आह

या अर्थसंकल्पात सर्वाधिक निधी अभियांत्रिकी विभाग (१ व २) अंतर्गत पायाभूत सुविधा आणि विकासकामांसाठी २ हजार ९१८.८१ कोटी इतका मंजूर करण्यात आला आहे. यामुळे पुणे महानगर क्षेत्रातील रिंग रोड, मेट्रो प्रकल्प, रस्ते विकास, कात्रज-येरवडा ट्विन टनेल, लोणावळा स्कायवॉक, पवना-इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प, अर्बन ग्रोथ क्लस्टर, सीएम पॅकेजमधील रस्ते, तीर्थक्षेत्र आणि पर्यटन विकास रस्ते, गृहनिर्माण प्रकल्प या कामांना गती मिळणार आहे. तसेच जमीन आणि मालमत्ता विभागासाठी ९७०.७६ कोटींचा भांडवली खर्च नियोजित करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे ‘पीएमआरडीए’मध्ये विलीनीकरण झाले होते. त्यानंतर मालमत्तांचे दायित्व ‘पीएमआरडीए’कडे आले आहेत. त्यानुसार जमीन विल्हेवाटीचे अधिकार थेट महानगर आयुक्तांना देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे भूखंड वाटप, हस्तांतरण, वारस नोंद, ना हरकत दाखला यांसारखी कामे आता अधिक जलद होतील, असा दावा करण्यात आला आहे.




### रिंग रोडसाठी तरतूद

**» प्रादेशिक योजनेतील रिंग रोडसाठी प्रकल्प अहवाल, प्रत्यक्ष काम आणि भूसंपादनासाठी स्थापन करण्यात आलेल्या ‘विशेष उद्देश वाहन’ मधील भांडवली सहभागासाठी तरतूद करण्यात आली आहे. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी एकूण ५५.०३ कोटींची तरतूद प्रस्तावित आहे.**

### रस्त्यांच्या कामांसाठी भरघोस निधी

**» औद्योगिक क्षेत्रांची कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी अडीच कोटींची तरतूद आहे. नागरी विकास केंद्रांना जोडणाऱ्या रस्त्यांसाठी शंभर कोटी प्रस्तावित आहेत. प्राधिकरण क्षेत्रातील आरपी, डीपी, सीएमपी, सीपीटीएस रस्त्यांच्या कामांसाठी दीडशे कोटी तरतूद आहे. प्राधिकरण क्षेत्रात पूल, सब-वे, रस्ते आणि रेल्वे उड्डाणपुलांच्या कामांसाठी दीडशे कोटींची तरररतूद करण्यात आली आहे..**

### पवना-इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प

**» इंद्रायणी नदी सुधारणेसाठी शंभर कोटी आणि पवना नदी सुधारणेसाठी चाळीस कोटी रुपयांची तरतूद आहे. मुळा-मुठा नदीसुधार प्रकल्पासाठी २.२० कोटींचे नियोजन करण्यात आले आहे. लोणावळ्यातील टायगर पॉइंट आणि लायन्स पॉइंट येथील पर्यटन विकास आणि स्कायवॉक उभारणीसाठी ५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.**


# पुरंदर विमानतळासाठी जमीन संपादनाला वेग; शेतकऱ्यांची 450 एकरला संमती

## सात गावांतील जमिनींसाठी भूसंपादन प्रक्रियेला गती; मोबदला वाटप लवकरच सुरू होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील नियोजित छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी जमीन संपादन प्रक्रियेला वेग आला असून, शेतकऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. कुंभारवळण, वनपुरी, एखतपूर, पारगाव मेमाणे, उदाची वाडी, मुंजवडी आणि खानवडी या सात गावांतील सुमारे 450 एकर जमीन देण्यास शेतकऱ्यांनी संमती दर्शविली आहे. सोमवारी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे संमतीपत्रे, तसेच प्रतिज्ञापत्रे सादर केल्याने मोबदला प्रक्रियेला गती मिळाली आहे.





या प्रकल्पासाठी यापूर्वीच सुमारे 3 हजार 200 शेतकऱ्यांनी जमीन देण्यास तत्त्वतः मान्यता दिली होती. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या पुढाकारामुळे शेतकऱ्यांसाठी आकर्षक मोबदल्याचे पॅकेज निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक शेतकरी समाधान व्यक्त करीत पुढे सरसावले आहेत. पॅकेज निश्चित झाल्यानंतर प्रशासनाने मोबदला वाटपाची प्रक्रिया सुरू करण्याचे नियोजन केले आहे.

यानंतर जमिनींचे संयुक्त मोजमाप, घरे, झाडे, पाइपलाइन यांचेमूल्यांकनकरूनमोबदल्याचा परिगणना तक्ता तयार केला जाईल. छाननी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना करारासाठी नोटिसा देण्यात येतील आणि भूसंपादन अधिकाऱ्यांसमवेत संमती करार केला जाईल. अंतिम टप्प्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर मोबदल्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

### जमीन संपादनाला वेग

**» शेतकऱ्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांमध्ये संबंधित जमिनीवर कोणताही खटला, बोजा किंवा वाद नसल्याची हमी देण्यात आली आहे. तसेच भविष्यात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी स्वतः घेण्याचेही त्यांनी नमूद केले आहे. पाचशे रुपयांच्या मुद्रांकावर ही प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आली असून, प्रशासनाकडून त्यांची सखोल छाननी केली जाणार आहे.**